# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-५१ दिनांक - १९/०२/२०२४

## मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन ०३ मोटार सायकल हस्तगत करण्यात माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १४/०१/२०२४ रोजी ०१.०० वा. ते १३.४५ वा. चे दरम्यान समाज मंदिर वाचनालयच्या पहिल्या गेट समोर, अंबाडी रोड, वसई पश्चिम, जि. पालघर येथे तक्रारदार नामे श्री. दिवाकर रामचंद्र घरत, वय ६२ वर्षे, यांनी त्यांची होंडा कंपनीची ग्लॅमर मोटारसायकल पार्क केली असता ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्वतःचे फायदयाकरीता उघडयावरुन चोरी केलेबाबत तक्रारदार त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. १४/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रीक तपासाच्या आधारे सापळा रचुन माजीवली परिसरातुन आरोपी नामे १) रुचिर कुणाल हिर्लेकर, वय ३३ वर्षे, रा. रुम नं. ११०२, ११ वा मजला, श्रीपती कैशल खेतवाडी, १० वी गल्ली, ग्रँडरोड पुर्व, मुंबई यास ताब्यात घेवुन घेवुन त्यांचेकडे तपासा केला असता सदर गुन्हातील त्यांचा सहभाग निषन्न झाल्याने सदर गुन्हात त्यांना अटक केली आहे. अटक आरोपी याचेकडे अधिक तपास करता अटक आरोपीत याने चोरी केलेल्या ०३ मोटारसायकल एकुण रु ५५,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन माणिकपुर पोलीस ठाणे अभिलेखावरील ०२ व बृहमुंबई शहर वाकोला पोलीस ठाणे येथील ०१ असे ०३ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

-: उघडकीस आलेले गुन्हे :-

**१) माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. १४/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि.**
**२) माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. १७/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि.**
**३) बृहमुंबई शहर वाकोला पोलीस ठाणे गु.र.क्र. ८७/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि.**

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौघुले श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व श्री संतोष चौधरी पोलीस निरीक्षक (प्रशासन/गुन्हे), गुन्हे प्रकटीकरणाचे पो.उ.नि. सनिल पाटील, पो.हवा. शैलेश पाटील, धनंजय चौधरी, शामेश चंदनशिवे, पो.अं.गोविंद लवटे, आनंदा गडदे, प्रविण कांदे व म.पो.अं. पुजा कांबळे यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.